महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक: डीआरए-०५२२/प्र.क्र.२०६/२०२३/जाहिरात दिनांक: १९ जानेवारी, २०२४

**-: शुध्दीपत्रक :-**

**विषय : विविध विषयांतील सहायक प्राध्यापक, गट-ब तसेच सहयोगी प्राध्यापक/प्राध्यापक, गट-अ, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये**

**संदर्भ : जाहिरात क्रमांक-१३५/२०२३ ते २६२/२०२३, २६३/२०२३ ते ३३१/२०२३ आणि ३३२/२०२३ ते ३९४/२०२३**

महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागातील वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवाअंतर्गत शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील **तसेच** नव्याने स्थापन झालेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, **अलिबाग, सातारा, सिंधुदुर्ग, नंदुरबार, उस्मानाबाद व परभणी** येथील **विविध विषयांतील सहायक प्राध्यापक, गट-ब तसेच सहयोगी प्राध्यापक / प्राध्यापक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, गट-अ** या संवर्गातील पद भरतीकरीता शासनाने पाठविलेल्या मागणीपत्राच्या अनुषंगाने अनुक्रमे दिनांक ०५ डिसेंबर, २०२३ (जा.क्र. १३५/२०२३ ते २६२/२०२३) व दिनांक १५ डिसेंबर, २०२३ रोजी जाहिरात (जा.क्र. २६३/२०२३ ते ३३१/२०२३ आणि जा.क्र. ३३२/२०२३ ते ३९४/२०२३) प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. त्यामधील खालील विवरणपत्रात नमूद संवर्गनिहाय विषयांकरीता शासन मागणीपत्रानुसार आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक (EWS) करीता पद आरक्षित असून अराखीवकरीता पदे कळविण्यात आलेली नाहीत.

**१.१ सहायक प्राध्यापक, गट-ब:-**

| अ.क्र. | जाहिरात क्रमांक | विषय | अ.क्र. | जाहिरात क्रमांक | विषय |
|---|---|---|---|---|---|
| १ | १४२/२०२३ | किरणोपचारशास्त्र | २ | १५०/२०२३ | कान, नाक व घसा शास्त्र |
| ३ | १५६/२०२३ | शल्यचिकित्साशास्त्र | ४ | १५७/२०२३ | क्ष-किरणशास्त्र |
| ५ | १५८/२०२३ | शरीररचनाशास्त्र | ६ | १५९/२०२३ | विकृतीशास्त्र |
| ७ | १६५/२०२३ | बालरोगचिकित्साशास्त्र | ८ | १७५/२०२३ | औषधवैद्यकशास्त्र |
| ९ | १८२/२०२३ | त्वचा व गुप्तरोगशास्त्र | १० | १८८/२०२३ | औषधशास्त्र |
| ११ | १९१/२०२३ | बधिरीकरणशास्त्र | १२ | १९४/२०२३ | औषधवैद्यकशास्त्र |
| १३ | १९६/२०२३ | क्ष-किरणशास्त्र | १४ | २०१/२०२३ | शरीरक्रियाशास्त्र |
| १५ | २०९/२०२३ | अस्थिव्यंगोपचारशास्त्र | १६ | २११/२०२३ | औषधवैद्यकशास्त्र |
| १७ | २१६/२०२३ | क्षयरोग व उरोरोग शास्त्र | १८ | २२८/२०२३ | औषधवैद्यकशास्त्र |
| १९ | २३४/२०२३ | शरीरक्रियाशास्त्र | २० | २३६/२०२३ | न्यायवैद्यकशास्त्र |
| २१ | २३७/२०२३ | जीवरसायनशास्त्र | २२ | २३८/२०२३ | नेत्रशल्यचिकित्साशास्त्र |
| २३ | २४०/२०२३ | बधिरीकरणशास्त्र | २४ | २४६/२०२३ | सूक्ष्मजीवशास्त्र |
| २५ | २५२/२०२३ | न्यायवैद्यकशास्त्र | २६ | २५३/२०२३ | रोगप्रतिबंधक व सामाजिक औषधवैद्यकशास्त्र |
| २७ | २५५/२०२३ | औषधशास्त्र | २८ | २५६/२०२३ | मनोविकृतीशास्त्र |
| २९ | २५८/२०२३ | अस्थिव्यंगोपचारशास्त्र | ३० | २५९/२०२३ | कान, नाक व घसा शास्त्र |

**१.२ सहयोगी प्राध्यापक, गट-अ:-**

| अ.क्र. | जाहिरात क्रमांक | विषय | अ.क्र. | जाहिरात क्रमांक | विषय |
|---|---|---|---|---|---|
| १ | २६३/२०२३ | शरीररचनाशास्त्र | २ | २६५/२०२३ | सूक्ष्मजीवशास्त्र |
| ३ | २७७/२०२३ | त्वचा व गुप्तरोशास्त्र | ४ | २७८/२०२३ | नेत्रशल्यचिकित्साशास्त्र |
| ५ | ३१४/२०२३ | सूक्ष्मजीवशास्त्र | | | |

**१.३ प्राध्यापक, गट-अ:-**

| अ.क्र. | जाहिरात क्रमांक | विषय | अ.क्र. | जाहिरात क्रमांक | विषय |
|---|---|---|---|---|---|
| १ | ३३९/२०२३ | क्षयरोगशास्त्र | २ | ३४०/२०२३ | क्ष-किरणशास्त्र |
| ३ | ३५३/२०२३ | सूक्ष्मजीवशास्त्र | ४ | ३५७/२०२३ | कान,नाक व घसा शास्त्र |
| ५ | ३६९/२०२३ | औषधशास्त्र | ६ | ३८२/२०२३ | नेत्रशल्यचिकित्साशास्त्र |
| ७ | ३८६/२०२३ | शल्यचिकित्साशास्त्र | ८ | ३८७/२०२३ | रोगप्रतिबंधक व सामाजिक औषधवैद्यकशास्त्र |
| ९ | ३८८/२०२३ | त्वचा व गुप्तरोगशास्त्र | १० | ३९४/२०२३ | न्यायवैद्यकशास्त्र |

**२.** तथापि, शासन पत्र, वैद्यकीय शिक्षण व ओषधी द्रव्ये विभाग, क्रमांक मलोआ २०२४/प्र.क्र.०९/२४/वैसेवा-२, दिनांक १८ जानेवारी, २०२४ अन्वये प्राप्त अभिप्रायानुसार, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक ३१ मे, २०१९ मधील तरतुदीच्या अनुषंगाने आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकाकरीता (EWS) आरक्षणांतर्गत सुयोग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास आरक्षणाचा अनुशेष पुढे न ओढता खुल्या प्रवर्गातून गुणवत्तेनुसार पदे भरणे आवश्यक असल्याचे कळविले आहे. त्यानुषंगाने उपरोक्त विवरणपत्रात नमूद संवर्गनिहाय व विषयनिहाय जाहिरातींकरीता खुल्या प्रवगातील अर्हताप्राप्त उमेदवारांना (मागासवर्गीय उमेदवारांसह) अर्ज सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात येत असून संवर्गनिहाय व विषयनिहाय जाहिरातींना अनुसरुन अर्ज सादर करण्याच्या प्रक्रियेस खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे:-

| अ.क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | **अर्ज सादर करावयाचा कालावधी** | **दिनांक २२ जानेवारी, २०२४ ते<br>दिनांक २९ जानेवारी, २०२४ रोजी २३.५९** |
| २ | **ऑनलाईन पध्दतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याकरीता अंतिम दिनांक** | **दिनांक ३१ जानेवारी, २०२४ रोजी २३.५९** |
| ३ | **भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याचा दिनांक** | **दिनांक ३१ जानेवारी, २०२४** |
| ४ | **चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरण्याचा अंतिम दिनांक** | **दिनांक ३१ जानेवारी, २०२४ रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेमध्ये** |

**३.** उपरोक्त नमूद जाहिरातींना अनुसरुन संवर्गनिहाय व विषयनिहाय विहित पध्दतीने अर्ज केलेल्या उमेदवारांनी पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

**४.** वयोमर्यादा गणण्याचा दिनांक तसेच शैक्षणिक अर्हता आणि अनुभव गणण्याचा कालावधी हा मूळ जाहिरातीमध्ये नमूद दिनांकानुसारच गणण्यात येईल.

**५.** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सनिव २०२३/प्र.क्र.१४/कार्या-१२, दिनांक ०३ मार्च, २०२३ अनुसार कमाल मयोमर्यादेत दोन वर्षे इतकी शिथिलता देण्यात येत आहे.

**६.** जाहिरातींमधील इतर अटी व तरतुदींमध्ये कोणताही बदल नाही.

**७.** सदर शुध्दीपत्रक तसेच उपरोक्त नमूद मूळ जाहिराती आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

उप सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : नवी मुंबई.

(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.
(२) प्रमाणपत्र तपासणीच्या वेळी पात्रतेसंदर्भातील सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास शिफारस/नियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही.